2033/ब 8
15-7-2015

# महाराष्ट्र शासन

**तात्काळ**

क्रमांक:- संग्राम-२०१४/प्र.क्र.२१२/संग्राम कक्ष
ग्रामविकास व पंचायत राज विभाग,
बांधकाम भवन २५, मर्झबान पथ फोर्ट,
मुंबई - ४०० ००१
दिनांक :- १० जुलै, २०१५

E-mail:epanchayat.maharashtra@gmail.com

प्रति,
१. विभागीय आयुक्त,
विभाग (सर्व)
२. जिल्हाधिकारी (सर्व)
३. मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद (सर्व)
४. मुख्य परिचालन अधिकारी,
महाऑनलाईन लि., मुंबई.

**विषय :- ग्रामपंचायत सदस्यांना निवडणुकीसाठी ऑनलाईन अर्ज भरणेबाबत व यासाठी कोणतेही शुल्क न आकारण्याबाबत.**

**संदर्भ :- शासन पत्र क्र. संग्राम-२०१४/प्र.क्र.२१२/संग्राम कक्ष दि. ३ जुलै २०१५**

महोदय,

राज्यात होणाऱ्या ग्रामपंचायत निवडणुकींसाठी निवडणुकींचे अर्ज भरण्याची प्रक्रिया ऑनलाईन करण्याचे धोरण राज्य निवडणुक आयोगाने निश्चित केले आहे. यासाठी महाऑनलाईनमार्फत ऑनलाईन अर्ज उपलब्ध करून देण्यात येण्यात आहे. सदर उमेदवारी अर्ज संग्राम केंद्रांमार्फत ऑनलाईन भरण्यासाठी ग्रामविकास विभागाने सहमती दर्शविलेली आहे.

दि. ३ जुलै २०१५ रोजीच्या पत्रामध्ये नामनिर्देशन अर्ज भरणाऱ्या उमेदवाराकडून रू. २०/- इतके शुल्क आकारून त्या शुल्काचे विभाजन रू. १०/- ग्रामपंचायतीसाठी व रू. १०/- संबंधित संगणक परिचालक (VLE) साठी असे आकारावयाचे होते. तथापि याबाबत राज्य निवडणुक आयुक्त यांचेकडे दि. ८ जुलै २०१५ रोजी झालेल्या बैठकीमध्ये जुलै व ऑगस्ट या कालावधीत होणाऱ्या ग्रामपंचायत निवडणुकांसाठी जास्तीत जास्त ग्रामपंचायत सदस्यांनी ऑनलाईन अर्ज भरणे व डिजिटल इंडियाची संकल्पना ग्रामीण जनमाणसात रूजवून त्यांना प्रोत्साहीत करण्यासाठी ऑनलाईन नामनिर्देशन करणाऱ्या उमेदवाराकडून कोणत्याही प्रकारचे शुल्क घेण्यात येऊ नये, असे निर्देश राज्य निवडणुक आयुक्त यांनी दिलेले आहेत.

यास्तव, दि. ३ जुलै २०१५ रोजीच्या या विभागाच्या शासन पत्रात नमूद केल्याप्रमाणे संग्राम केंद्रातून जुलै व ऑगस्ट या कालावधीत होणाऱ्या ग्रामपंचायत निवडणुकांसाठी नामनिर्देशनासाठी अर्ज भरल्यास उमेदवाराकडून कोणतेही शुल्क ग्रामपंचायतीने आकारू नये.

आपली,

Archana

(अर्चना वालझाडे)
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

प्रत :-
१) श्री. अविनाश सणस, प्रभारी उपायुक्त, राज्य निवडणूक आयोग
२) स्वीय सहायक, राज्य निवडणुक आयुक्त, मा. राज्य निवडणुक आयुक्त यांचे अवलोकनार्थ
३) स्वीय सहायक, सचिव, राज्य निवडणुक आयोग, मा. सचिव, राज्य निवडणुक आयोग यांचे अवलोकनार्थ
४) स्वीय सहाय्यक, प्रधानसचिव (ग्रामविकास)
५) स्वीय सहाय्यक, उपसचिव (संग्राम)
६) स्वीय सहाय्यक, उपसचिव (पंचायती राज)